क्र.कार्या-१२-क/ग्रा.पं./आरआर/३९२/१७
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
दिनांक: - २२/०८/२०१७

**प्रति,**

**मुख्य कार्यकारी अधिकारी ,**
**जिल्हा परिषद कोल्हापूर.**

**विषय:-ग्रामपंचायत निवडणूक - खर्च मर्यादा :**
**१. सदस्य पदाच्या उमेदवारांसाठी पुर्निधारित.**
**२. सरपंच पदाच्या उमेदवारांसाठी प्रथमच निश्चित करण्याबाबत.**

संदर्भ:-मा.राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.११/का-८, दि. २१ ऑगस्ट २०१७

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन मा.राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांनी ग्रामपंचायतींच्या सदस्य पदाच्या निवडणुकीकरीता उमेदवाराने करावयाच्या खर्चाची सुधारित मर्यादा आणि ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाच्या निवडणुकीकरीता उमेदवारांने करावयाच्या खर्चाची मर्यादा प्रथमच निश्चित करण्यात येवून संदर्भीय आदेशान्वये या कार्यालयास कळविलेले आहे. त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की सदर **ग्रामपंचायत निवडणूक खर्च मर्यादेबाबतच्या आदेशास** आपल्या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा. सोबत मा.राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश जोडलेला आहे.

आपला विश्वासू

(संजय शिंदे)
निवासी उपजिल्हाधिकारी कोल्हापूर तथा
नोडल अधिकारी.ग्रामपंचायत सार्वत्रिक
निवडणूक २०१७ कोल्हापूर

ग्रा.पं.निवडणूक- खर्च मर्यादा :
१. सदस्य पदाच्या उमेदवारांसाठी पुनर्निर्धारीत.
२. सरपंच पदाच्या उमेदवारांसाठी प्रथमच निश्चित करण्याबाबत.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.११/का-८
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ ऑगस्ट, २०१७

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचलन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे,

२. आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने आदेश रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१७/का-५, दि. ३० जुलै २०११ अन्वये उमेदवाराने महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा,पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये करावयाची खर्चाची मर्यादा विहित केली आहे,

३. आणि ज्याअर्थी, ग्रामपंचायतींमध्ये किमान ३ व कमाल ६ प्रभाग असून आयोगाच्या उक्त आदेशान्वये ग्रामपंचायतींच्या सदस्य पदांकरिता निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निवडणुकीमध्ये करावयाची खर्चाची मर्यादा सर्व ग्रामपंचायतींसाठी सरसकट रु. २५,०००/- एवढी ठेवण्यात आली असून यामध्ये वस्तुनिष्ठ पध्दतीने सुधारणा करणे आवश्यक आहे,

४. तसेच ज्याअर्थी, सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १६ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी दि.१९ जुलै २०१७ रोजी प्रख्यापित केलेल्या अध्यादेशात ग्रामपंचायत सरपंच पदाकरीता थेट निवडणूक घेण्याची तरतूद करण्यात आली आहे,

५. आणि ज्याअर्थी, या सुधारणांनुसार महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १० पोटकलम (१ अ) नुसार ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी थेट निवडणूक ग्रामपंचायतींच्या निवडणुकांबरोबर एकाच वेळी घेण्यात येईल.

६. आणि ज्याअर्थी, सदस्य सरपंच पद हे सर्व प्रभागांकरीता सामायिक असून प्रत्येक प्रभागातून या सामायिक पदासाठी मतदान होणार आहे हे लक्षात घेता सरपंच पदाच्या उमेदवारास ग्रामपंचायतींच्या सर्व प्रभागांमध्ये प्रचाराकरीता संपर्क साधणे आवश्यक आहे; त्यामुळे प्रभाग संख्येच्या प्रमाणात सरपंच पदाच्या उमेदवाराची निवडणूक खर्च मर्यादा निर्धारित करणे क्रमप्राप्त आहे;

७. त्याअर्थी, ग्रामपंचायतीच्या सदस्य पदाच्या निवडणुकीमध्ये उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा पुनर्निधारीत करणे आवश्यक असून सरपंच पदाच्या निवडणुकीत उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा प्रथमत: नव्याने निश्चित करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

७.१ ग्रामपंचायतींच्या सदस्य पदाच्या निवडणुकीकरीता उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा ही पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

| अ.क्र | ग्रामपंचायतींची सदस्य संख्या (सरपंच पद वगळून) | सदस्य पदाच्या उमेदवाराने करावयाच्या खर्चाची विद्यमान मर्यादा | सदस्य पदाच्या उमेदवाराने करावयाच्या खर्चाची सुधारीत मर्यादा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | ७ व ९ सदस्य | | रु. २५.०००/- |
| २ | ११ व १३ सदस्य | रु.२५,०००/- | रु. ३५,०००/- |
| ३ | १५ व १७ सदस्य | | रु.५०,०००/- |

७.२ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाच्या निवडणुकीकरीता उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा प्रथमच पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | ग्रामपंचायतींची सदस्य संख्या (सरपंच पद वगळून) | सरपंच पदाच्या उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | ७ व ९ सदस्य | रु. ५०,०००/- |
| २ | ११ व १३ सदस्य | रु.१,००,०००/- |
| ३ | १५ व १७ सदस्य | रु.१,७५,०००/- |

वरील आदेश तात्काळ अंमलात येतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(री. वि. फणसेकर)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :

१. मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन.
२. विभागीय आयुक्त, सर्व.
३. जिल्हाधिकारी, सर्व. *(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)* यांनी सदर आदेश निवडणुकीशी सर्व संबंधितांच्या तात्काळ निदर्शनास आणून यास स्थानिक वृत्तपत्रात प्रेसनोटद्वारे व्यापक प्रसिध्दी द्यावी.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.
५. माहिती व जनसंपर्क अधिकारी रानिआ
६. स्वीय सहायक, मा. आयुक्त व सचिव
७. आयोगातील सर्व कार्यासने
८. निवड नस्ती.